Agro Inputs Manufacturers Association of India

Regd. No. MH323/2012

# Agro Inputs Manufacturers Association
(of india)

दि. २८.१२.२०१५

प्रति,

मा. श्री विकास देशमुख साहेब,

कृषीआयुक्त महाराष्ट्र, कृषीआयुक्तालय मध्यवर्तीभवन,

पुणे.

विषय:- बिगर नोदंणीकृत उत्पादने विक्री बाबत.

संदर्भ :- दि. २.१२.२०१५ रोजी आमच्या असोसिएशन ने दिलेले पत्र.

महोदय,

वरिल विषयाचे व वरिल संदर्भाचे पत्र आम्ही आपणास दि. २.१२.२०१५ रोजी दिले होते, त्यावेळेस आपणाबरोबर या विषयावर सविस्तर चर्चाही झाली होती. तद्नंतर नागपूर येथील हिवाळी अधिवेशन व इतर कामामध्ये आपण व्यस्त होता. मागील महिन्यामध्ये "ॲग्रोवन" दैनिकामध्ये बिगरनोदंणीकृत उत्पादना संदर्भात आलेल्या लेखमालीकांमुळे मार्केटमध्ये काहिशी गोंधळाची स्थिति निर्माण झाली, त्यातच आपल्या खात्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील अधिकाऱ्याने बिगरनोदंणीकृत उत्पादने विक्री करण्यास विक्रेत्यांना प्रतिबंध केल्याने मार्केट मध्ये खुपच गोंधळाची स्थिति निर्माण झाली. बऱ्याच विक्रेत्यांनी अशा प्रकारची उत्पादने आपल्या दुकानात ठेवण्यास व त्याची विक्री करण्यांस थांबविल्याने शेतकरी वर्गातुनही काहीसा तक्रारीचा सूर काही भागात दिसून आला. त्याचप्रमाणे अशा प्रकारचे बिगरनोदंणीकृत निविष्ठांचे उत्पादन करणाऱ्या उत्पादक कंपन्यामध्येही घबराट निर्माण झाली, कारण अनेक उत्पादकांने लाखो रुपये गुंतवून ही उत्पादने तयार केली होती व ऐन मोसमामध्ये त्याची विक्री बंद केल्याने त्यांचे खूप मोठ्याप्रमाणात नुकसान होत आहे. अजुनही मार्केट मध्ये अशीच परिस्थिती आहे यामुळे खालील समस्या उदभवत आहेत.

Received
Raagh
28/12/15

अ) अशा प्रकारचे उत्पादने मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. सांगलीमध्ये असे काही शेतकरी एकत्र येऊन कृषी अधिकारी कार्यालयामध्ये धरणे आंदोलन केले होते.

ब) काही विक्रेते या संधीचा गैरफायदा घेऊन अशी उत्पादने आपल्या दुकानामध्ये न ठेवता इतरत्र ठेऊन ती शेतकऱ्यांना अधिक किमतीने विकत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

क) या उत्पादनास दुकानातून विक्री बंद केल्यामुळे या उत्पादनाची विक्री मंदावल्याने उत्पादक कंपनीचा व्यवसाय अडचणीत आला आहे .

Office Adderss : Chhatrapati Shivaji Market Yard, Shop No.6, 1st Floor. Madhyavarti Bhavan, Gultekdi, Pune- 411037
Ph-020-24274482 Email- info@aimassociationindia.com. Website-www.aimassociationindia.com

ड) अशी उत्पादने दुकानात न ठेवता इतरत्र ठेऊन विक्री केली जात असल्याने त्यावर कुठलेही नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही त्यामुळे काही बोगस उत्पादने शेतकऱ्यांना विकली जाऊन शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे.

इ ) अशी उत्पादने दुकानात ठेऊ दिली जात नाहीत म्हणुन काही उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीवर जाऊन या उत्पादनाची विक्री करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांची फसवणुक होत आहे.

वरील मुद्यांचा गांभिर्याने विचार करून आपण यावरती काहीतरी ठोस उपाययोजना करावी अशी आम्ही आपणास विनंती करीत आहोत. आमचे असोसिएशन या विषयावर मागील चार वर्षापासून यासाठी नियुक्त केलेल्या कमिटीला सहकार्य करुन या उत्पादनास विक्री परवाना मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहे. तरी कृपया यावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने आपण आमच्या असोसिएशन मधील इतर आवश्यक बांबींची पूर्तता करणाऱ्या उत्पादकांना अशी उत्पादने विक्रीस परवानगी द्यावी ही विनंती.

दरम्यान आपण प्रत्येक जिल्ह्याच्या कृषीविकास अधिकाऱ्याना अशा प्रकारची उत्पादने दुकानात ठेवण्यास प्रतिबंध न करण्याचा तसेच त्याची विक्री न थांबविण्याची सूचना द्याव्यात ही विनंती.बऱ्याच ठिकाणचे कृषी अधिकारी विक्रेत्यांना तोंडी आदेश देऊन अशी उत्पादने दुकानात ठेवू नये अशी तंबी देत आहेत. तरी कृपया आपण या विषयाकडे गांभीर्याने पहावे व यातून लवकरात लवकर मार्ग काढावा ही विनंती.

धन्यवाद!

आपले विश्वासु,

समीर पाथरे
सचिव,
ॲग्रो इन्पुटस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

Agro Inputs Manufacturers Association
Reg. No. 323

राजकुमार धुरगुडे
अध्यक्ष,
ॲग्रो इन्पुटस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन